

# वारसा विधिविधान आणि संरक्षण
# मुंबईत आणि इतरत्र : स्वयंसेवी संस्थांचे प्रयत्न
# सहा बृहन्मुंबईसाठी नागरी संरक्षण उपसमिती

**श्याम चैनानी**

जानेवारी 1988 मध्ये आणखी एक मुख्य महत्त्वाचा टप्पा गाठला.

महाराष्ट्र शासनाने काही काळापूर्वी, बृहन्मुंबईकरिता विकास नियंत्रणविनियमन (इमारत विनियम आणि उपविधी) मधील बदलांच्या विचारार्थ एक सचिव (विभाग प्रमुख असलेला वरिष्ठ मुलकी अधिकारी) समिती गठित केली होती.

माजी महापालिका आयुक्त जमशेद कांगा यांच्या पुढाकाराने त्यांच्याच अध्यक्षतेखाली बृहन्मुंबई वारसा संरक्षण प्रक्रियेला सर्वसाधारण सल्ला देण्यासाठी वारसा विनियमांसंदर्भात सूचना करण्यासाठी, वारसावास्तुंची सूची करणे इत्यादी साठी नागरी संरक्षण उपसमिती (ज्यात वारसा संघाच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला होता) गठित करण्यात आली होती.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या 11 जानेवारी, 1988च्या निरनिराळ्या वारसा संस्थांना पाठविलेल्या पत्राने या कामाला सुरुवात झाली. या पत्राने प्रथमत: मुंबईतील आणि राज्यांतील इतर शहरांतील ऐतिहासिक आणि वास्तुशिल्पीय इमारतींच्या संरक्षणाकरिता विनियम अस्तित्त्वात नसल्याचे नमूद केले. विकास योजनेत (बृहन् योजना) वस्तुत: संरक्षणावर नवीन प्रकरण अंतर्भूत करण्याचे प्रस्तावित करण्याचे आणि बृहन्मुंबईकरिता विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात आल्याचेही या पत्राद्वारे सांगण्यात आले.

या पत्रासोबत एक यादीही जोडण्यात आली. त्यात 145 इमारती, 7 संरक्षण क्षेत्रे, आणि 9 संकल्पनारुपी परिमंडले यांचा समावेश आहे. त्यात संरक्षणासाठी विकास नियंत्रण नियमावलीचे प्रारुपही अंतर्भूत आहे.

हे एक आणखी पुढचे पाऊल आहे. कारण त्यात फक्त ऐतिहासिक आणि स्मारकरुपी इमारतींचे संरक्षण करावयाचा विचार व्यक्त केला नव्हता. तर वस्तुशिल्पीय इमारतींचा समावेश होतो. दुसरे असे की जरी त्यात ऐतिहासिक प्रसीमांच्या विनिर्दिष्ट संदर्भ नव्हता तर त्याला जोडपत्रातील संरक्षण क्षेत्रे आणि संकल्पना नियंत्रण परिमंडलाचाही अंतर्भाव होतो. तिसरे असे की, विनियमाचे प्रारुप असे होते की, त्यात पुढील

कार्यवाहीसाठी पाया तयार केला होता. कदाचित सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यात नमूद केले होते की, फक्त मुंबईतील वास्तूंचेच संरक्षण करणे आवश्यक आहे असे नव्हे तर राज्यातील इतर भागांचेही संरक्षण करण्याचा विचार मांडला होता.

## मुंबईकरिता वारसा समिती

महाराष्ट्र शासनाचे नगर विकासमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी ऑगस्ट 1990 मध्ये मला भेटायला बोलाविले. त्यावेळी मी त्यांना मुंबईकरिता वारसा समिती नेमण्याविषयी सांगितले

त्यांनी मला विचारले की, पूर्वीची उपसमिती कार्यरत असताना आणि त्यांचे उपसमितीचे काम जवळजवळ पूर्ण झाले (ते काम पूर्ण झाले नव्हते) असताना मी नवीन समितीची मागणी का करतो आहे? मी त्यांच्या निदर्शनास आणले की जर शासनाने शासन निर्णय प्रस्तुत केला आणि औपचारिक समिती गठीत केली तर त्या समितीतील फार मोठी वैधानिकता प्राप्त होईल. ती वारसा विनियमनाच्या संधी कमी करेल आणि उच्चतम न्यायालयीन स्वेच्छ निर्णयाच्या आधारावर किंवा गैर लागू तत्त्वावर जी वारसा सूची फेटाळून लावली आणि पूर्वनिर्णयानुसार इतरत्रच्या समकार्यवाहीसाठी तो एक पायंडा ठरेल. सुशिलकुमार शिंदे यांनी ही वारसा समिती नेमण्याचे मान्य केले. ही समिती27 ऑगस्ट, 1990च्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आली.

या समितीची स्थापना ही मोठा पायंडा होता कारण पुणे शहरासाठी तत्सम समितीची स्थापना करण्याच्या कामी आम्हाला शासनाचे मन वळवता आले. आमच्या विनंतीनुसार ती लगेचच गठीत करण्यात आली. आणखी असेच भारत सरकारने दि. 31 ऑक्टोबर, 1990 च्या पत्रान्वये आमच्या विनंतीनुसार दि 27 ऑगस्ट, 1990चा हा महाराष्ट्र शासनाचा निर्णय इतर राज्य शासनांच्या मुख्य सचिवांना प्रस्तुत केला आणि त्या राज्यांना विनंती केली की, ''तुमच्या राज्यांतील मौलिक वारसा स्थळे निश्चित करा आणि त्याचे रक्षण करण्यासाठी'' तत्सम कार्यवाही करण्याचा विचार करावा.

## बृहन्मुंबई वारसा सूची

शासनाने 1990च्या अखेरीस बृहन्मुंबईकरिता प्रारुप विकास नियंत्रण विनियमांना जवळजवळ अंतिम रुप दिले. तर शासनाद्वारे वारसा विनियमांना राजपत्रित करावयाचे असेल त्याचबरोबर अन्य विकास नियंत्रण विनियम हे राजपत्रामध्यचे समाविष्ट करुनच मग त्यांना राजपत्रित करता येऊ शकेल. त्याचप्रमाणे शासन वारसा सूची राजपत्रात समाविष्ट करू इच्छिते. मी महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे सचिव डी.टी. जोसेफ यांच्या निदर्शनास आणले की, ही यादी कुठल्याही प्रकारे परिपूर्ण नव्हती आणि त्यात त्रुटी राहिल्या होत्या. यादी अपूर्ण असल्याच्या संदर्भात डी.टी. जोसेफ यांनी अचूकतेने सांगितले की, सूची तयार करण्याची प्रक्रिया ही सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि त्या यादीत नंतरही सतत इमारतीची भर पडत राहील. त्यांनी मला त्रुटींची टक्केवारी किती असू शकेल असा प्रश्न विचारला. त्यावर मी 5 टक्के असे उत्तर दिले. त्यावर ते म्हणाले की, 5 टक्के त्रुटी मला चालतील आणि लोकांच्या तक्रारीच्या आणि सूचनांच्या सुनावणीच्या वेळी या त्रुटी काढून टाकता येतील. वस्तुतः आक्षेप आणि सूचनांची प्रक्रिया हीच मुळी त्यासाठी होती.

या प्रकारे निर्णय क्षमता ही शासनात दुर्मिळच. एखादा धाडसी आणि उद्बोधक नागरी सेवक आपल्या कामगिरीत हे दाखवू शकतो. डी.टी. जोसेफ यांना शंभरपैकी शंभर गुण दिले पाहिजेत.

बृहन्मुंबईची प्राथमिक वारसा सूची अंतिमतः वारसा समितीचे अध्यक्ष जमशेद कांगा यांनी 5 सप्टेंबर, 1990च्या पत्रान्वये शासनाला सादर केली. या यादीसह पाठवलेल्या पत्रात नमूद करण्यात आले होते की ही सूची प्राथमिक स्वरुपाची होती आणि त्यात बदल करणे आवश्यक होऊ शकते. मात्र या टप्प्यांपर्यंत कधीही त्या यादीत सुधारणा सुचवली नाही. त्यामुळे शासनाला छाननीला सुरुवात करता आली. दुसरे असे की शासन ही सूची महानगरपालिकेला पाठवू शकले आणि विकासकार्यासाठी परवानगी देताना या सूचीचा

(एमआरटीपी अधिनियमाच्या कलम 46 च्या तरतुदींनुसार) विचार करू शकतात.

एमआरटीपी अधिनियम 1966 अनुसार या स्वरुपाचा कोणताही प्रस्ताव हा नियोजन प्रधिकाऱ्यांच्या कल्पनेतूनच यावा असे अपेक्षित होते. जेव्हा विकासकामांना परवानगी दिली जाते. तेव्हा अशा प्रस्तावाला काही संविधीमान्य आधार हवा.

## प्रारुप वारसा विनियम आणि प्रारुप वारसा यांचा राजपत्रात समावेश

बृहन्मुंबईसाठी सूची - यातून तिसऱ्या चिन्हांकित टप्प्याला 20 फेब्रुवारी, 1991 रोजी जन्म दिला हा दिवस आमच्या कायम स्मरणात राहील. महाराष्ट्र शासनाने जनतेकडून आक्षेप आणि सूचना मागवण्याच्या प्रयोजनार्थ प्रारुप मुंबई वारसा विनियम राजपत्रातून प्रसिद्ध केले स्वतंत्रपणे परंतु त्याचदिवशी शासनाने बृहन्मुंबईची वारसा सूचीसुद्धा प्रसिद्ध केली.

विनियमान आणि सूची हे संपूर्णपणे स्वतंत्र आहेत हे लक्षात घ्यावे. सूची हा विनयंमाचा भाग नव्हे.

जरी वारसा सूची तोपर्यंत प्रकाशित प्रारुप स्वरुपात होती तरी तिला कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले होते. एमआरटीपी अधिनियमाच्या कलम 46 मुळे मुंबईमध्ये प्रथमच सांविधिक आधार प्राप्त झाला होता. आणि काही लहान अपवादासह भारतात, वास्तुशिल्पीय इमारतींव्यतिरिक्त वारसा इमारती आणि प्रतिमा यांना कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले होते.

## 27 सप्टेंबर, 1991 चे स्पष्टीकरण

वारसा विनयम आणि वारसा सूची प्रसिद्ध झाल्यानंतर, वारसा इमारती म्हणून सूचीबद्ध केल्यामुळे त्या इमारतींच्या मालकांना त्यांची मालमत्ता गमावण्याची पाळी येईल अशी काहीशी सार्वजनिक आशंका निर्माण झाल्याचे दिसून आले होते. म्हणून शासनाने 27 सप्टेंबर, 1991 अनुसार स्पष्टीकरणात्मक अधिसूचना प्रस्तुत केली. स्पष्टीकरणात्मक राजपत्रात असे नमूद केले की, शासनाने तोवर वारसा विनियमांना मंजुरी दिलेली नव्हती, की संरक्षित करावयाच्या इमारतींच्या यादीला अंतिम स्वरुपही दिलेले नव्हते. इमारतींची सूचीबद्ध केल्यामुळे त्या इमारतींच्या वापरात बदल करण्यात अडसर येणार होता किंवा ती विकण्यात अथवा तिची विल्हेवाट लावण्यात बंधन येणार होते असे नाही ही बाब उघड होती. तरी तिचे पूर्णपणे आकलन झालेले नव्हते हेही शासनाने स्पष्ट केले. यातील अश्वासता कमी करण्याच्या दृष्टीने वारसा इमारतीच्या निरनिराळ्या प्रतवारीसाठी कोणकोणत्या प्रकारचे बदल करता येऊ शकतील याचाही शासनाने उलगडा केला. याशिवाय एम.आर.टी.पी. अधिनियमानुसार आक्षेप आणि सूचना सादर करण्याच्या दिवसांच्या मुदतीऐवजी आणखी दोन महिन्यांची मुदत वाढ दिली म्हणजेच एकूण सात महिन्यांची मुदत देण्यात आली.

## काही समस्या

वारसा सूची आणि विनियम प्रारुप स्वरुपात होते तो 1991-95 या दरम्यानचा काळ अनेक प्रकारच्या धक्क्यांचा आणि गंडांतराचा काळ होता. पर्यावरणीय आणि वारसा प्रचारा दरम्यानच्या प्रक्रियेत विकसित झालेल्या अरिष्टांविषयी काहीशी कल्पना यावी यासाठी दोहोंचा उल्लेख येथे केला आहे.

राज्य शासनाने विश्रांतीगृह ‘सह्याद्री’ जे महाराष्ट्राच्या उप-मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान होते आणि जेथे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी वास्तव्य केले होते. सह्याद्री ती इमारत वारसा सूचीमध्ये अंतर्भूत केली होती. तथापि शासनाने ज्यावेळी शरद पवार हे मुख्यमंत्री होते - सर्वोच्च स्तरावर सदर इमारत पाडायची आणि त्याठिकाणी दुसरी नवीन इमारत उभारायची असा निर्णय घेतला होता.

भारतीय वारसा संस्थेने (इंडियन हेरिटेज सोसायटी) (मुंबई प्रकरण) (आरएमएस) - त्यावेळी हेता पंडित तिचे नेतृत्व करीत होती. त्यांनी सदर इमारत पाडण्याच्या निर्णयाला रिट पिटीशनद्वारे न्यायालयात आव्हान देण्याचे ठरविले. कारण मुख्यमंत्री संपूर्ण वारसा सूची रद्दबादल ठरवतील. ती सूची तोपर्यंत प्रारुप स्वरुपात होती आणि त्यासंदर्भात लोकांनी अनेक प्रकारचे आक्षेप घेतले होते. त्यामुळे ही पोकळ कल्पनाच ठरली.

यावर वारेमाप चर्चा झाल्यानंतर (क्लेशकारक विरहीत नाही अशी) आयएचएसने न्यायलयाकडे धाव न घेण्याचा निर्णय घेतला.

दुसरी समस्या जैन मंदिराची (पायधुणी) येथील जैन शांतिनाथ मंदिर) या मंदिराच्या विश्वस्तांनी दावा केला की मंदिराची जीर्णावस्था झाली असल्यामुळे ते पडून त्याची पुनर्बांधणी करू इच्छित होते. वारसा सल्लागार समितीने (जी महापालिका आयुक्तांना सल्ला देत असे) सदर मंदिर पाडण्यास आणि पुनर्बांधणीस परवानगी देऊ नये अशी शिफारस केली. संरचना अभियंत्यांचे मत सल्लागार समितीने घेतले आणि त्या मतानुसार ते बांधकाम न पाडता त्याचा पुनर्विकास होऊ शकतो. महापालिका आयुक्त शरद काळे, अगदी दुर्मिळ प्रकरणातच यांनी हा सल्ला मानला नाही. तो फेटाळून लावला.

त्यानंतर कला आणि सांस्कृतिक वारसा त्यांनी भारतीय राष्ट्रीय धर्मादाय संस्था (आयएनटीएसएच) आणि भारतीय वारसा संस्था (आयएसएस) यांनी रिट अर्ज दाखल केला. ज्या गोदरेज यांनी या विनंती अर्जावर त्यांची स्वाक्षरी केली होती त्या सोराबजी गोदरेज (गोदरेज उद्योग समूहाचे अध्यक्ष) यांना तीव्रता सतवणुकीला तोंड द्यावे लागले. त्यांच्या घरापुढे आणि गोदरेज उद्योग समुहांपुढे घेरावे आणि निदर्शने केली. मात्र गोदरेज ठाम राहिले येथे1993च्या अखेरीस त्यांना अशीही धमकी देण्यात आली की, जर हा अर्ज मागे घेण्यात आला नाही तर मग सर्व धार्मिक वास्तू वारसा सूचीतून वगळण्यात येतील. धार्मिक संवेदनशीलता म्हणजे ते जसे आहेत तरी समजावी. ही फक्त पोकळ धमकी नव्हती. दयेच्या भावनेनेसुद्धा अर्ज परत घेतला नव्हता तरीही वारसा यादीतून धार्मिक इमारती वगळण्यात आल्या नव्हत्या. मात्र त्याचीकिंमत मोजावी लागली. धार्मिक इमारतीच्या बाबतीतील विनियम सैल करण्यात आले.

या घटनांमुळे वारसा विनियम आणि मुंबईकरिता सूची यांना अंतिम मंजूरी मिळण्यास विलंब लागला. इतर शहरांकरितासुद्धा तत्सम कार्यवाही करण्यासाठी विलंब लागला.

**आक्षेप आणि सूचना यावर विचार विनिमय**

आक्षेप आणि सूचना यांच्या सुनावणीच्या लोकतांत्रिक पद्धतीने खूप कालावधी (दोन्हीवरही - प्रारुप विनियम आणि प्रारुप यादी यावर) घेतला.

एकूण 935 आक्षेप सूचना स्वीकारण्यात आल्या. आणि प्रत्येक बाबींची सुनावणी झाली.

ज्यांनी आक्षेप आणि सूचना केल्या त्यातील अनेकांनी वारसा जतन ही एक आदर्श कल्पना असल्याचे सांगितले. मात्र वारसा सूचीतून त्यांची इमारत वगळावी असे सूचविले. सर्वसाधारणपणे स्थापत्यतज्ज्ञ आणि व्यावसायिक संस्था यांनी वारसा सूची आणि वारसा विनियम यांना विरोध केला. आक्षेप आणि सूचना यांच्या सुनावणीसाठी नेमलेल्या अधिकाऱ्याने सुनावणीनंतर प्रस्तावित करावयाचे प्रारुप विनियम बऱ्याच प्रमाणात सौम्य करण्यात आले. दुसरे असे की, फार मोठ्या संख्येने इमारती आणि प्रसीमा यांना वगळण्याचे प्रस्तावित करण्यात आले. तिसरे असे की, काही संख्येनी प्रत-1च्या इमारतींचा दर्जा कमी करून त्यांना प्रत-2मध्ये अंतर्भूत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. यामागे जे कारण (दर्जा कमी केलेल्या बहुतेक सर्व इमारती) दिले ते असे की, या इमारतींभोवती फार मोठ्या प्रमाणात मोकळी जागा होती आणि या मोकळ्या जागेवर इमारती बांधण्यास मालकांना अटकाव करणे औचित्याला धरून झाले नसते. प्रारुप विनियमानुसार प्रतवारी-2च्या इमारती संदर्भातील बदल करण्यास जो वाव आहे. त्यामुळे त्या इमारतीच्या कुंपणात अतिरिक्त इमारत बांधण्यास परवानगी नाही.

मी या सर्व बाबी शासनासमोर एका वर्षाच्या कालाधीत विस्तृतपणे मांडल्या. मोठ्या संख्येने झालेल्या बैठकी आणि पुनरावृत्ती केलेली प्रतिनिधीत्वे यामुळे विनियमातील सौम्यपणा हा सर्वसाधारणपणे काढून टाकला गेला, वस्तुतः अंतिम मंजूर झालेले विनियम हे मूलतः प्रकाशित प्रारुप विनियमापेक्षा फारच सौम्य होते.

सूचीतून वगळण्यात आलेल्या इमारतीसंदर्भात नगर

विकास सचिव डी. टी. जोसेफ यांनी प्रारंभी काही इमारतींचा अंतर्भाव रोखून ठेवण्यास सहमती दर्शवली. तथापि, विनियम आणि सूचीच्या जलद मंजूरीकरता दबाव असल्यामुळे सचिवांनी वारसा सूची आहे तशीच ठेवायचा निर्णय घेतला. तथापि तसे करताना मात्र त्यांनी वारसा जतन समितीला, वगळण्यात आलेल्या सर्व इमारतींसंदर्भात पुन:तसापणी करावी असे निर्देश दिले.

बांधकाम न करावयाच्या मोकळ्या जागे संदर्भातील आक्षेपांची पडताळणी करण्याच्या दृष्टीने, अनेकवेळा झालेल्या चर्चेनंतर, दर्जा-दोन हा दर्जा दोन-अ आणि दर्जा दोनच्या संदर्भात बदल करण्यास वाव देण्याचा सुरुवातीचा निर्णय ठेवून घेण्यात आला. दर्जा-दोन-ब मध्ये अतिरिक्त जी मान्यता दिली होती त्याचा अर्थ एकाच भूखंडावरील किंवा कुंपणातील विस्तारित इमारत किंवा अतिरिक्त इमारत असा होय, मात्र असे की, विस्तारित / अतिरिक्त इमारत ही मूळ इमारतीशी (अलग असता कामा नये) किंवा प्रसीमेशी सुसंगत विशेषकरून उंची आणि दर्शनी बाजूशी असली पाहिजे. दर्जा कमी केलेल्या इमारतींचा (जवळजवळ त्यापैकी 100) दर्जा हा दर्जा-दोन-'ब' असा वाढवायचा होता.

इतर आणि प्रथमत: अत्यंत समर्थपणे तातडीचे म्हणजे अतिरिक्त प्रसीमा यांची वारसा सूचीमध्ये, वाढ करायची होती. डीटी जोसेफ, त्या विलंब झालेल्या टप्प्यात असे करण्यास विशेष करून या प्रसीमांच्या संदर्भात सूचना आणि आक्षेप मागवण्यात आल्या नव्हत्या. म्हणून चाचरत होते. तथापी, सामंजस्याचा मार्ग म्हणून महानगरपालिका / प्रस्तावित वारसा संरक्षण समिती यांना, या प्रसीमांच्या अंतर्भाव करण्याचा प्रश्न तपासून पाहण्यासाठी निर्देश देण्यास येतील अशी सहमती त्यांनी दर्शवली. स्वेच्छेने आमचे म्हणणे ऐकून घेण्याबद्दल आणि त्यांचे स्वत:चे निर्णय फिरवण्याचे नैतिक धैर्य दाखवल्याबद्दल डी.टी. जोसेफ, आणि जी. एस. पंतबाळेकुद्री (अनुक्रमे तत्कालीन सचिव आणि उपसचिव) यांना मी धन्यवाद देऊ इच्छितो.

तथापि, आमच्यावर ज्यामुळे पाठीमागून वार झाले ते विनियम परिपूर्ण करण्यास मिळालेले यश तसेच उत्तम विनियम तयार करण्यासाठी खूप कालावधी लागला. नगर विकास विभागाचे मंत्री अरुण गुजराथी यांनी 1994 च्या अखेरीस फाईलवर सही केली, निवडणूक प्रक्रियेस सुरुवात झाली होती. एकदा का निवडणूक प्रक्रिया सुरू झाली की, कुठलाही धोरणात्मक निर्णय किंवा घोषणा करण्यावर शासनाला प्रतिबंध केला जातो. जरी वारसा विनियम आणि वारसासूची ही कोणत्याही व्यक्तीच्या लाभाकरता दिली नसल्याचे भासते असा काल्पनिक आटापिटा केला तरी ती गोष्ट पटण्यासारखी नव्हती. तरी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक आयुक्त डी.के. शंकरन यांनी हे प्रकरण निवडणूक आयुक्त टी.एन.शेषन यांना संदर्भित केले. शेशन यांनी वारसा विनियम आणि सूची यांना निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत मान्यता देण्यास नकार दिला. मी त्यांना चांगल्याप्रकारे ओळखत होतो पण दुर्दैवाने त्यांचा निर्णय फिरवण्यासाठी त्यांना भेटून प्रयत्न करणे आणि राजी करणे हे मी करू शकलो नाही.

मतदान आणि मतमोजणी यामध्ये बराच कालावधी होता. प्रथमत: असे सांगण्यात आले की, मतदान झालेले असल्याने (कारण त्यानंतर मतदानांवर प्रभाव टाकण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.) मंजुरीस राजपत्रात प्रसिद्धी देता येऊ शकते - परंतु तसे नव्हते - याच निवडणुकीत काँग्रेस सरकारला पराभवाचा धक्का बसला. काही का असेना तणावपूर्व प्रतीक्षेनंतर नवीन मुख्यमंत्र्यांनी फाईलवर सही केली. नैराश्यतेतील तणावपूर्व प्रर्तीक्षा हे एक वरदानच ठरले कारण सामर्थ्यशाली वेगवेगळ्या मूलगामी धर्ममताच्या दोन शासनांनी वारसा विनियम आणि वारसा सूचीला मंजूरी दिली.

### वारसा जतन संकल्पनेला शासनाची मंजुरी
### बृहन्मुंबईसाठी विनियम आणि वारसा सूची

एप्रिल 1995 हा मुंबईच्या वारसा चळवळीच्या दृष्टीने आणि भारतातील सर्वांत महत्त्वाचा चिन्हांकित टप्पा होता.

दिनांक 21 एप्रिल, 1995 रोजी शासनाने विकास नियंत्रण विनियम क्र. 57 ला - म्हणजेच वारसा विनियमाला - मान्यता असल्याचे कळवले.

दुसरे असे की, 24 एप्रिल, 1995 रोजी शासनाने वारसा सूचीला मंजूरी दिल्याचे कळवले.

तिसरे असे की, दि. 25 एप्रिल, 1995 च्या राजपत्रात शासनाने वारसा संरक्षण समितीच्या सभासदत्वाच्या अर्हता नमूद केल्या. इतर गोष्टींबरोबरच त्यांची भूमिका अशी की वारसा इमारती आणि प्रसीमा यांच समावेश करण्यासंदर्भात मान्यता देणे किंवा नकार देण्याबाबत महानगरपालिका आयुक्तांना सल्ला देणे.

चौथे असे की, दि. 25 एप्रिल, 1995 रोजी शासनाने बृहन्मुंबई महापालिका आयुक्तांना पत्र पाठवले. या पत्रात अनेक सांविधानिक निर्देशांचा समावेश आहे.

प्रथमतः आक्षेप आणि सूचना प्रक्रिये दरम्यान लोकांनी शिफारस केलेल्या अतिरिक्त इमारती आणि प्रसीमा यांचा वारसा सूचीमध्ये अंतर्भाव करावा किंवा असे याबाबत वारसा संरक्षण समितीने विचार करावा असे शासनाने निर्देश दिले होते. दुसरे असे की, वारसा संरक्षण समितीला, मूलतः प्रसिद्ध केलेल्या वारसा सूचीतून गाळलेल्या इमारतींची पुनःपरीक्षा करण्याविषयी निर्देश दिले होते. हे दुसरे निर्देश अत्यंत शिरस्त्याला सोडून होते. कारण त्यात शासनाने स्वतः गठित केलेल्या समितीला स्वतःच्याच कार्यवाहीचे पुनःपरीक्षण करण्याचे निर्देश दिले होते.

तिसरे असे की, वारसा संरक्षण समितीने सात मोठ्या अतिरिक्त प्रसीमांची सूचीत भर घातल्याच्या प्रश्नांचे परीक्षण करण्याचे त्यात निर्देश होते. त्या प्रसीमा म्हणजे मरीन ड्राईव्ह प्रसीमा, नेपियन सी रोड प्रसीमा, ओल्ड कफ परेड प्रसीमा, कुपरेज विकास प्रसीमा, खोदादाद सर्कल प्रसीमा, गावदेवी प्रसीमेच्या दक्षिणेकडील क्षेत्र आणि माटुंग्याची फाईव्ह गार्डन प्रसीमा हे होते.

शासनाने 26 एप्रिल, 1995 रोजी महानगरपालिका आयुक्तांना वरील निर्णय तातडीने अंमलात आणावा असे निर्देश दिले आणि त्यात वगळण्यात आलेल्या इमारतींच्या पुनःपरीक्षण आणि वारसा सूचित भर घातलेल्या इमारती तसेच प्रसीमा यांचे परीक्षणाच्या कामासाठी, चार महिन्यांच्या कालावधीची मर्यादा घालून दिली.

**अनुवादक : दत्ता कुलकर्णी**

■ ■ ■ ■ ■

